साप्ताहिक
शुक्रवार, १७ एप्रिल २०२०
किंमत १० रुपये

कोकण मीडिया

रत्नागिरी

'दर्पण'भूमीचे प्रतिबिंब

हेल्पिंग हँड्स : करोनालढ्यातील मानवी साखळी

दिव्यांगांचे जगणे करू सोपे...

हेल्पिंग हँड्स : करोनालढ्यातील मानवी साखळी

करोनाप्रतिबंधक संचारबंदीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचा मागणीप्रमाणे घरपोच पुरवठा करण्याचे सेवाभावी कार्य रत्नागिरीतील अनेक सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे चालविले आहे. सहकार रुजत नाही, म्हटल्या जाणाऱ्या कोकणात तब्बल २९ संस्था एकत्र येऊन 'हेल्पिंग हँड्स' नामक अदृश्य साखळीद्वारे हे कार्य करत आहेत. विनामोबदला आणि प्रसिद्धीपासून दूर राहून काम करणाऱ्या या संघटनेच्या कार्याला दाद द्यायलाच हवी.

मुखपृष्ठकथा

राजेंद्रप्रसाद मसुरकर
(संपर्क : ९९६०२४५६०१)

''ब्रिटिश सरकारच्या राजवटीत भारतात प्लेगच्या साथीने थैमान घातले तेव्हा सावित्रीबाई फुले पदर खोचून रुग्णांच्या सेवेसाठी बाहेर पडलेल्या. अहोरात्र सेवा कार्य करता करता त्यांनाही प्लेगने गाठले आणि त्यातच त्यांचा अंत झाला. त्यागाचे हे कौतुकास्पद उदाहरण आहे. महिलांच्या शिक्षणात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सावित्रीबाईंचा हाच मानवतेचा वारसा जपण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.''

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या रत्नागिरी शाखेचे वल्लभ तथा भैय्या वणजू यांचे हे उद्‌गार. ***''सुविधा नसताना सावित्रीबाईंनी सेवाकार्यात स्वतःला झोकून दिले. आज करोनाच्या रूपाने सामाजिक संकट आलेले आहे आणि तशीच झोकून देऊन काम करण्याची गरज आहे''***, असे त्यांनी सांगितले.

करोनाच्या अभूतपूर्व संकटाने सर्वांचीच झोप उडाली आहे. या विषाणूची लागण होण्याचा धोका टाळण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या संचारबंदीमुळे आणि लॉक डाऊनमुळे बाजारपेठा बंद झाल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंची दुकाने उघडी असली तरी खरेदीसाठी जाणाऱ्यांचीही कसून चौकशी होत आहे. जीवनावश्यक वस्तू घेण्याकरिता बाहेर पडणाऱ्यांच्या वर्दळीतून होणाऱ्या संभाव्य संसर्गाची शक्यताही टाळण्याकरिता या वस्तू शक्यतो घरपोच देणे हा अधिक प्रभावी मार्ग आहे. मात्र अशी सेवा पुरविणे केवळ दुकानदारांना शक्य नाही आणि शासनाचे मनुष्यबळही अशा कामात पुरेसे ठरणार नाही.

मग यासाठी सरसावले सहकारी वृत्तीच्या शेकडो रत्नागिरीकरांचे हात. निरनिराळ्या २९ संस्थांचे १४८ कार्यकर्ते पुढे आले. त्यातून उभी राहिली एक अभिनव मानवी साखळी. तिचे सगळे दुवे अदृश्य आहेत. ते सलगपणे कुठे उभे राहिलेले दिसत नाहीत. पण त्यांच्यात एक बंध आहे मानवतेच्या भावनेतून आणि शहराबद्दलच्या प्रेमातून आपत्कालीन परिस्थितीत धावून जाण्याच्या प्रेरणेचा. वेगवेगळी उद्दिष्टे (वरवर पाहता एखादी अगदी रविवारच्या सुट्टीच्या दिवशी काही हौसेची भटकंती वगैरे करण्यासाठी एकत्र आलेल्यांची) पण आता एकच लक्ष्य : शारीरिक अंतर राखून विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी पुकारण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचे!

कोकणात सहकार रुजत नाही, असे म्हटले जाते. मग दीडशे सभासदांच्या २९ संस्था पाऊण महिना हे काम कसे काय करू शकल्या? याचे उत्तर आहे त्यांच्या निरपेक्ष वृत्तीमध्ये आणि कौशल्यपूर्ण समन्वयामध्ये. हा समन्वय साधण्याची अवघड कामगिरी सुहास ठाकूरदेसाई आणि कौस्तुभ सावंत या हॉटेल व्यावसायिक जोडगोळीने केली आहे.

या वेळेच्या सांघिक कामाची बीजं पेरली गेली ती मागच्या पावसाळ्यातील भयानक पूरपरिस्थितीतून. त्यावेळचे रत्नागिरीचे जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांना जिल्ह्यातून पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना मदत पाठवायची होती, एका पद्धतशीर व्यवस्थेतून. मदत करायला उत्सुक तर सगळेच होते, पण अशी लहान-मोठी मदतीची पार्सल एकटा-दुकटा माणूस कशी पाठवणार? त्यांचे वितरण नेमक्या गरजूंमध्ये कसे होणार? त्यासाठी सगळ्यांनी एकत्र यायचे आणि गोळा केलेली मदत एकत्रितपणे पाठवायची, हेच योग्य. मग जिल्हाधिकाऱ्यांनी शहरातील स्वयंसेवी संस्थांची सभा बोलावली. कल्पना मांडली. ठरलेल्या ठिकाणी मदत संकलन केंद्रे उभी राहिली. प्रत्येक वस्तूची नोंद होऊन पार्सल तयार झाली. दहा-दहा टनाचे दोन ट्रक भरून मदतीच्या वस्तू रवाना झाल्या.

सुहास ठाकूरदेसाई म्हणाले की, या कार्यामुळे आत्मविश्वास मिळाला. रत्नागिरी शहराच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून जनजागृती संघ या संस्थेची स्थापना कौस्तुभ सावंत यांच्या नेतृत्वाखाली झाली. टाळेबंदीमध्ये नागरिकांना घरपोच वस्तू पुरविण्याच्या कार्यात या संघटनेचे कार्यकर्तेही सहभागी झाले **(पान ४ वर)**

कोकण मीडिया हे **कोकण मीडिया कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेसचे** साप्ताहिक रत्नागिरीतून प्रसिद्ध होते. पालघर ते सिंधुदुर्ग या संपूर्ण कोकणातल्या विविध विषयांची चर्चा घडवावी, भाषा आणि संस्कृतीचे आदानप्रदान व्हावे, एकमेकांच्या खाद्यसंस्कृतीचा परिचय व्हावा, खास कोकणाच्या अशा समस्यांची एकत्रित चर्चा व्हावी, हा या साप्ताहिकाचा उद्देश आहे. साप्ताहिकात कोकणविषयक चालू घडामोडींवर चर्चा, मालवणी, संगमेश्वरी, बाणकोटी, राजापुरी, आगरी अशा खास कोकणी बोलींवरचे सदर, मुलाखती, शेतकऱ्यांचे प्रयोग, वैद्यकीय माहिती, पुरातन मंदिरे, सण, उत्सव, परंपरांची माहिती तसेच महामार्ग, कोकण रेल्वेनंतर कोकणाच्या भविष्याचा वेध घेणारे लेखनही प्रसिद्ध केले जाते. दिवाळी अंकासह साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी ६०० रुपये आहे. साप्ताहिकाचे वर्गणीदार होण्यासाठी संपर्क साधावा.
(अधिक माहितीसाठी पान ३ पाहावे.)

साप्ताहिक कोकण मीडिया रत्नागिरी
'दर्पण'भूमीचे प्रतिबिंब

वर्गणी थेट बँकेत भरण्यासाठी तपशील :

कोकण मीडिया कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेस
(Kokan Media Consultancy and Services).
Saraswat Co-Op. Bank, RATNAGIRI Branch
A/c. No. 225100100000346.
IFSC SRCB0000225.

(वर्गणी बँकेत भरल्यास ९४२२३८२६२१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर त्वरित कळवावे.)

साप्ताहिक
कोकण मीडिया

❊ वर्ष : ४, अंक : २३
('कोकण मीडिया कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेस'चे प्रकाशन)
RNI No. MAHMAR/2016/72126
शुक्रवार, ता. १७ एप्रिल २०२०

मुखपृष्ठ :
चित्रसौजन्य : इंटरनेट
आतील व्यंगचित्रे : देविदास देशपांडे, पुणे
❊ पाने १२ ❊ किंमत १० रुपये

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :
साप्ताहिक कोकण मीडिया,
कोकण मीडिया कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेस,
'कुसुमसुधा', ६९७, रामचंद्रनगर (श्रीनगर),
गांधी ऑटोमोबाइल्सच्या मागे, आकाशवाणी प्रक्षेपण
केंद्रासमोर, खेडशी, रत्नागिरी ४१५६३९.
संपर्क : (०२३५२) २२८०३७, ९८२२२५५६२१
व्हॉट्सअॅप : ९४२२३८२६२१
संपर्क कार्यालय : हॅवेल्स गॅलरी, साईकृपा अपार्टमेंट,
श्री धन्वंतरी आयुर्वेदनजीक, सावरकर नाट्यगृहाजवळ,
नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी - ४१५६१२
ई-मेल : kokanmedia@kokanmedia.in
वेबसाइट : http://kokanmedia.in
ब्लॉग : http://kokanmedia.blogspot.in
फेसबुक : https://facebook.com/kokanmedia
ट्विटर हँडल : : @kokanmedia

❊ कोकण मीडिया कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेसचे हे साप्ताहिक मालक, मुद्रक आणि प्रकाशक बाळकृष्ण विष्णु कोनकर यांनी सत्यशोधक प्रिंटिंग प्रेस, ३००३, टिळक आळी, रत्नागिरी येथे छापून 'कुसुमसुधा', ६९७, रामचंद्रनगर (श्रीनगर), खेडशी, रत्नागिरी ४१५६३९ येथे प्रसिद्ध केले.

वार्षिक वर्गणी : ६०० रुपये
संपादक : बाळकृष्ण ऊर्फ प्रमोद विष्णु कोनकर
This Weekly Kokan Media printed, published and owned by Balkrishna Vishnu Konkar, on behalf of Kokan Media Consultancy and Services and printed at Satyashodhak Printing Press, 3003, Tilak Lane, Ratnagiri-415612 and published at Kusumsudha, 697, Ramchandra Nagar (Shree Nagar), Behind Gandhi Automobiles, Khedshi, Ratnagiri - 415639. Editor: Balkrishna alias Pramod Vishnu Konkar. Volume: 4. Issue: 23. Friday, 17th April 2020.

❊ 'साप्ताहिक कोकण मीडिया'मध्ये प्रकाशित होणाऱ्या जाहिरातींसंदर्भातील आर्थिक व्यवहार वाचकांनी कृपया संपूर्णपणे स्वतःच्या जबाबदारीवर करावेत. त्यासाठी 'साप्ताहिक कोकण मीडिया' कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. ❊ अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांमधील मते त्या त्या लेखकांची आहेत. त्या मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

संपादकीय

आढावा बैठका आणि दौरे आधी थांबवा

करोनाविरुद्धची लढाई आता एका निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. गर्दी कमी करणे हा त्यातील सर्वांत चांगला उपाय असल्याचे सातत्याने सांगितले जात आहे. सोशल डिस्टन्सिंग म्हणजे सामाजिक अंतर, दोन व्यक्तींमध्ये अंतर राखणे आवश्यक आहे. याबाबत अनेक वेळा विविध स्तरांवर सांगितले गेले आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि स्थानिक जिल्हा प्रशासनही सातत्याने वेगवेगळ्या माध्यमातून सोशल डिस्टन्सिंगबाबत माहिती देत आहे. आपल्या देशात करोनाच्या प्रादुर्भावात वाढ होत असली तरी अन्य काही देशांच्या तुलनेत ती वाढ झपाट्याने झालेली नाही. कित्येक लोकांनी करोनाप्रतिबंधक संचारबंदीसाठी लागू केलेले नियम अमलात आणले. त्यामुळे हे यश आतापर्यंत मिळाले आहे. मात्र हे नियम धाब्यावर बसविणारे अनेकजण आहेत. अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली जाणीवपूर्वक किंवा नकळतपणे नियम तोडले जात आहेत. त्यातून अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

करोनाच्या प्रतिबंधासाठी आर्थिक मदत संकलित केली जात आहे. जीवनावश्यक वस्तूंचे वितरण सामाजिक संस्था, व्यक्ती आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून केले जात आहे. हे सारे सोशल डिस्टन्सिंग पाळून केले जात नसेल, तर ते गंभीर आहे. रत्नागिरीतील गेल्या आठवड्यातील उदाहरण बोलके आहे. काही सामाजिक संस्था आणि उद्योजकांनी मुख्यमंत्री मदत निधीकरिता धनादेश दिले. रत्नागिरीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे हे धनादेश सुपूर्द करताना धनादेश देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आमदार आणि इतर व्यक्तीही उपस्थित होत्या. त्यांची संख्या पाचपेक्षा अधिक होती. असे कार्यक्रम अनेक ठिकाणी होत आहेत. अनेक लोक एकत्र येऊन जीवनावश्यक वस्तू देताना किंवा धनादेश प्रदान करताना छायाचित्रे काढणाऱ्यांवर कारवाईचा इशारा अहमदनगरचे जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी यांनी दिला आहे. तो स्वागतार्ह आहे. खासगी व्यक्ती आणि संस्थांबरोबरच प्रशासन आणि शासन म्हणून जे प्रतिनिधी सोशल डिस्टन्सिंगबाबत वारंवार लोकांचे प्रबोधन करत आहेत, ते स्वतः मात्र हे सामाजिक अंतर राखताना दिसत नाहीत. सातत्याने घेतल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठका, अधूनमधून होणाऱ्या पत्रकार परिषदांमध्ये अनेक व्यक्ती एकत्र येत असतात. वास्तविक त्याची काहीही गरज नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री तर संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात ठिकाणी तसेच पालकमंत्री या नात्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात सातत्याने आढावा बैठका घेत आहेत. आधुनिक संपर्क यंत्रणेच्या काळात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे अशा बैठका घेणे सहज शक्य असताना ते स्वतः दोन्ही जिल्ह्यांचा प्रवास नियमितपणे करत आहेत. जिल्ह्यात येणाऱ्या किंवा जिल्ह्याबाहेर जाणाऱ्या अधिकाऱ्यांना जेव्हा कारवाईचा इशारा दिला जातो, तेव्हा दोन जिल्हे सातत्याने फिरणाऱ्या मंत्र्यांचे वागणे योग्य म्हणता येणार नाही. ते आणि त्यांच्या समवेत सातत्याने असणारे त्यांचे स्वीय सहाय्यक आणि इतर अधिकारी असा दौरा नियमितपणे करत असतील तर त्यांच्यामाफतसुद्धा नकळतपणे रोगाचा फलाव होऊ शकतो, हे नाकारून चालणार नाही. गृहनिर्माण मंत्री आणि ठाण्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना याच कारणामुळे चौदा दिवस स्वतःहून विलगीकरणात जावे लागले आहे. सिंधुदुर्गच्या पालकमंत्र्यांनी हे लक्षात घ्यायला हवे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे मिळून एकंदर १७ तालुके आहेत. प्रत्येक तालुक्याची बैठक दररोज एकाच ठिकाणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे ते घेऊ शकतील. प्रत्येक जिल्ह्याची रोज एक बैठकही ते त्याच पद्धतीने घेऊ शकतील. मदतीसाठी दिले जाणारे धनादेश परस्पर बँकेत जमा करायला सांगितले गेले पाहिजे. संपर्कामुळे पसरणाऱ्या साथीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शकांकडूनच अयोग्य वर्तन झाले तर लोक ती बाब गांभीर्याने घेत नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री आवश्यक ते सामाजिक अंतर राखूनच लोकांशी संवाद साधत आहेत, हेही लक्षात घ्यावे.

(पान २ वरून)

हेल्पिंग हँड्स : करोनालढ्यातील मानवी साखळी

आहेत. नागरी हिताचे कार्य करताना अन्य संस्थांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न ही संस्था नेहमीच करते. काही महिन्यांपूर्वी रत्नागिरी शहरात झालेल्या लष्करभरतीच्या वेळीही त्यांनी पुढाकार घेतला. भरतीसाठी आलेल्या सात हजार उमेदवारांना मारुती मंदिर या मध्यवर्ती ठिकाणी विनामूल्य खिचडी वाटपाची व्यवस्था करण्यात आली. या खिचडीचा खर्च जैन संघटनेने दिला. आपत्ती अथवा मोठ्या गर्दीच्या वेळी मदतीला धावून जात रत्नागिरीतील या नागरिकांनी कोकणवासीयांची सहकार्याची वृत्ती सहजपणे प्रकट केली.

हे कार्य एका विशिष्ट पद्धतीने विशिष्ट व्यक्तींच्या माध्यमातून आणि संपूर्ण विनामूल्य करण्यात येते. यात सहभागी झालेले सेवाभावी नागरिक शहरात विविध क्षेत्रांमध्ये काम करतात. त्यामध्ये व्यावसायिक, व्यापारी, लघुउद्योजक, प्राध्यापक, शासकीय कर्मचारी अशा सर्वच स्तरांवरील नागरिक आहेत. महिलाही मागे नाहीत. धर्माचे बंधन नाही. जातीचा अडसर नाही. विचारसरणीमुळे यात कोणाला आडकाठी नाही. ''हम चलेंगे साथ साथ डाले हाथों में हाथ'' अशा शब्दांत ही एकजूट वर्णन करता येईल.

जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा यांनी अत्यंत कार्यक्षम रीतीने रत्नागिरी जिल्ह्यात लॉक डाऊनची अंमलबजावणी सुरू ठेवली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंडे आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी या महामारीचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. प्रशासनाने जारी केलेल्या व्यवहार बंद ठेवण्यासंबंधीच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या काळात नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचा सुरळित पुरवठा व्हावा, यासाठी स्वयंसेवकांच्या माध्यमातून नागरिकांचे सहकार्य मिळत आहे. रत्नागिरीच्या नागरिकांनी साकार केलेले सेवाभावी कार्याचे हे एक मॉडेलच म्हणता येईल.

जिल्हाधिकारी श्री. मिश्रा यांनी यापूर्वी सामाजिक संस्थांनी केलेल्या कार्याची माहिती घेऊन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याच्या योजनेसंबंधी या संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. यावेळी या कार्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारू, असे म्हणत कौस्तुभ सावंत यांनी स्थानिक व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तू घेतल्या गेल्या पाहिजेत, या मुद्द्यावर भर दिला. सर्वत्र अवाढव्य दुकानांच्या साखळ्या असणाऱ्या कंपन्यांच्या ऐवजी शहर आणि परिसरातील व्यापाऱ्यांकडून जिन्नस घ्यावे. म्हणजे अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतील पदार्थ विकणाऱ्या स्थानिक दुकानदारांना तरी दिलासा मिळेल आणि नागरिकांना नेहमीच्या दुकानातील जिन्नस मिळतील, ही यामागची कल्पना.

यानंतर सर्व संस्थांनी हेल्पिंग हँड्स या बॅनरखाली हे काम करण्याचे ठरले. कौस्तुभ सावंत यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी दोन गोष्टी स्पष्ट केल्या. एक म्हणजे या संस्थांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचे समाजात स्वतःचे स्थान आहे, परंतु लॉक डाऊनच्या काळात घरोघरी वस्तू पोहोचविण्यासारखे काम करताना कोणीही लाज वाटता कामा नये. कोणीही कमीपणा बाळगू नये. दुसरे म्हणजे एका संसर्गजन्य विकाराची साथ असल्यामुळे ही टाळेबंदी लावण्यात आली आहे. त्यामुळे स्वतःची संपूर्ण काळजी घेऊन ही जोखीम पार पाडायची आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे भैय्या वणजू यांनी सांगितले की, वस्तू यादीनुसार पोचत्या करताना आम्ही आवर्जून सुरक्षिततेची काळजी घेतो. दुकानदाराने सामान तयार ठेवलेली असते. त्याचा माणूस ते वाहनात ठेवतो. ज्यांना पुरवठा करायचा आहे, ती माणसे स्वतःच्या हाताने जिन्नस, पार्सल काढून घेतात. वृद्ध व्यक्तींना आम्ही मदत करतो. शक्य तेवढ्या कमी व्यक्तींचा स्पर्श वस्तूंना व्हावा ही यामागची कल्पना आहे. घरी गेल्यावर बाहेरचे कपडे स्वतंत्र ठेवणे, मास्क वापरणे आणि साबणाने हात-पाय स्वच्छ धुणे ही खबरदारी प्रत्येक कार्यकर्ता घेतो.

हेल्पिंग हँड्सच्या बॅनरखाली काम करणारी कोणतीही संस्था किंवा व्यक्ती स्वतःच्या नावाचे प्रदर्शन कोठेही करत नाही. केवळ जिन्नस पोहोचविण्याचे कामच नाही, तर इतरही नाना प्रकारच्या सेवा विशेषतः जेवणाची व्यवस्थाही केली जात आहे. हे करताना कोणी मोबदला तर घेत नाहीच, परंतु सर्वजण स्वतःच्या खिशातून खर्चही करत आहेत.

यातील मागणीबरहुकूम वस्तू पोहोचविण्याच्या कामात पैशाची देवघेव, हिशेब यांचा संबंध येतो. त्यामुळे कुठल्या दुकानातून कुठल्या ग्राहकासाठी किती रुपयांचा जिन्नस आणून दिला, याचा हिशेब आवश्यक त्या पावत्यांच्या प्रतीसह रोजच्या रोज ठेवला जातो. २७ मार्च २०२० रोजी हेल्पिंग हॅण्डसची ही सेवा सुरू झाली. १४ एप्रिल २०२० पर्यंत सर्व स्वयंसेवकांनी एकूण एक हजार ४८५ कुटुंबापर्यंत किराणा आणि औषधे मिळून २३ लाख ५३ हजार ९८९ रुपयांचा माल पोहोचविला. हा माल पोहोचविण्यासाठी स्वयंसेवक कोणतेही शुल्क घेत नाहीत. काही नागरिक स्वतःहून पैसे देऊ करतात. परंतु प्रत्यक्ष वापरलेल्या पेट्रोलच्या किमतीएवढे पैसे फार तर घेतले जातात. याची एकदोन बोलकी उदाहरणे ब्रह्मरत्न या संस्थेच्या कौस्तुभ जोशी या कार्यकर्त्याने सांगितले काही. ग्राहक दोन-दोनशे रुपये सेवाशुल्क म्हणून देऊ करतात. पण वाहतुकीसाठी जेवढ्या किमतीचे पेट्रोल लागले तेवढेच पैसे स्वयंसेवक घेतात.

ब्रह्मरत्न या संस्थेचे मुख्य कार्य मुंज झालेल्या सामान्य ब्राह्मण कुटुंबातील मुलांना वेदाध्ययन देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. दरवर्षी याकरिता रत्नागिरीत १५ दिवसांचे शिबिर भरवण्यात येते. मात्र कोणत्याही आपत्तीच्या काळात, सामाजिक अडचणीच्या प्रसंगात ज्ञातीचा विचार न करता सर्वांच्या मदतीला धावून जाण्याचे सूत्र या संस्थेकडून पाळले जाते. गेल्या वर्षातील पूरप्रसंगात या संस्थेने मोठ्या प्रमाणावर नागरिकांकडून मदत गोळा केली. त्याची रीतसर पोचपावती प्रत्येकाला दिली आणि पूरग्रस्तांपर्यंत दोन ट्रक भरून वस्तू पोहोचविल्या.

वैश्य युवा या संस्थेचे देवेंद्र वणजू यांनी शिवहरी शांभवी फाउंडेशन या संस्थेतर्फे गरीब कुटुंबांना विनामूल्य धान्य वाटप केल्याचे सांगितले. रत्नागिरीतील वणजू मंडळींनी स्थापन केलेल्या या चॅरिटेबल ट्रस्टने तब्बल अडीचशे कुटुंबांच्या पोटापाण्याची आपत्कालीन व्यवस्था केली.

हेल्पिंग हँड्सच्या बॅनरखाली काम करणाऱ्यांच्या समोर आव्हानांचा डोंगर उभा आहे. नुसती उचलली वस्तू, नेऊन दिली, असे होत नाही. घाणेकर आळी मित्रमंडळाचे समीर काळे नोकरीनिमित्ताने एकटेच कोल्हापूरला राहतात. लॉक डाऊन जाहीर झाल्यावर ते रत्नागिरीला स्वतःच्या वाहनाने येत होते. वाटेत बंदोबस्तावरील पोलिसांचे होणारे हाल त्यांच्या लक्षात आले. दिवाळीत महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती बनविण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या या मित्र मंडळाने त्याच दिवशी आयोजित केलेल्या सभेत सेवाकार्याचा विचार झाला आणि दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत घाणेकर आळी मित्र मंडळ हेल्पिंग हँड्समध्ये सहभागी झाले. नेमून दिलेल्या परिसरातील सहा दुकानांमधून नागरिकांना मागणीप्रमाणे जिन्नस नेऊन देण्याचे काम तर त्यांनी केलेच, पण शहर परिसरातील जवळजवळ वीस पोलिस तपासणी नाक्यांवर चहा आणि नाश्ता नियमितपणे नेऊन देण्याची जबाबदारीही शिरावर घेतली. भल्या पहाटे उठून हे कार्यकर्ते कामाला लागतात. सकाळी सात-सव्वासात वाजेपर्यंत चहा-नाश्त्याचे वाटप करून परत आलेलेसुद्धा असतात.

संकल्प युनिक फाउंडेशनने जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना अन्न पुरविण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या संस्थेतर्फे सकाळी आणि संध्याकाळी ही सेवा पुरविली जाते. रुग्ण आणि नातेवाईकांना चहा आणि नाश्त्याची सुमारे दीडशे पाकिटे सकाळीच दिली जातात. दुपारचे जेवण नेऊन दिले जाते. गेला पाऊण महिना फैजल सरदार हे मिरकरवाडानिवासी मच्छीमारी व्यावसायिक स्वखर्चाने जेवण तयार करून घेऊन पाठविण्याची व्यवस्था करताहेत, असे संकल्प युनिक संस्थेचे

शकील गव्हाणकर यांनी सांगितले. रात्रीच्या भोजनाची जबाबदारी कोकणनगर येथील रहिवाशांनी घेतली आहे. रोज एका घरातर्फे हे केले जाते. आजूबाजूच्या ५६ भगिनी जमून स्वयंपाक करतात आणि पाठवून देतात. अन्नपूर्णच त्या!

या रुग्णालयात 'राम रोटी' ही आटोपशीर पॅकेट काळी विनामूल्य वितरित करण्याचे काम शिवप्रसाद महाजनी यांच्या आठवणीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी स्थापन केलेल्या ट्रस्टतर्फे केले जाते. गेली चार-पाच वर्षे दहा रुपयांमध्ये राम रोटी उपलब्ध करून देऊन रुग्णांच्या नातेवाईकांची मोठी सोय या ट्रस्टने केली आहे. आता आपत्तीच्या काळात ही राम रोटी विनामूल्य दिली जाते. वाटपाचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) कार्यकर्ते करतात. गजानन करमरकर यांनी या संघटनेच्या सहभागाबद्दल सांगितले की, कार्यकर्त्यांचे दोन गट केले आहेत. एक गट किराणा आणि भाजीपाला पोहोचवितो, तर दुसरा गट औषधे नऊन देतो. श्री. करमरकर टपाल खात्यात एका जबाबदारीच्या पदावर आहेत. एका वृद्ध दाम्पत्याकडे ते जिन्नस घेऊन गेले आणि फोन केला. दाम्पत्याने दुकानदाराचा माणूस समजून सामान वर घेऊन यायला सांगितले. त्यांची अडचण समजून घेऊन श्री. करमरकर पार्सलांचे बोजे घेऊन गेले, तेव्हा ते दुकानदाराचे नोकर नव्हेत, तर कार्यकर्ते असल्याचे समजताच आजी-आजोबांना गहिवरून आले!

किती संस्था! किती लोक!! केवढा सेवाभाव!!!

अनुलोम ही संस्था गेली पाच वर्षे जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना नाममात्र भाड्याने एअर बेड, वॉटरबेड अशा उपचारोपयोगी वस्तू पुरविते. संकटकाळी या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी रोज सायंकाळी रुग्णांच्या नातेवाइकांना जेवण पुरविण्याचे काम अंगावर घेतले आहे. स्वखर्चाने रोज पन्नास माणसांची सोय ते करतात. समीर करमरकर यांनी ही माहिती दिली.

जेवण पुरविण्याची ही कामगिरी खूप व्यापक आहे. रत्नागिरी शहर आणि भोवतालच्या परिसरातील पोलिसांना दररोज आरोग्यवर्धक सरबत पुरविण्याचे काम बजरंग दलाचे कार्यकर्ते करतात, असे प्रशांत डिंगणकर यांनी सांगितले. या संस्थेतर्फे जिल्हा रुग्णालयातील रुग्णांसाठी दररोज न्याहारीची सुमारे दीडशे पाकिटे वाटली जातात. योजक संस्थेकडून सरबत दिले जाते.

मिरकरवाडा येथील खैर उम्मद फाउंडेशन ही गरिबांना मदत करणारी संस्था आहे आहे. घरी आणि दुकानात चंदा गोळा करण्याचे डबे ठेवून त्यामध्ये जमलेल्या पैशातून ही मदत पुरविली जाते. धनिक लोक वैयक्तिक पातळीवर फाउंडेशनला देणग्या देतात. या संस्थेचे सेक्रेटरी अब्दुलकरीम मजगावकर यांनी सांगितले की, लॉक डाऊन जाहीर होताच संस्थेतर्फे १०५ कुटुंबांना प्रत्येकी बंद लखोट्यातून ५०० रुपयांच्या रोख रकमेचे वाटप करण्यात आले आणि मागोमाग दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे प्रत्येकी आठशे रुपये किमतीचे किट या कुटुंबांना पुरविण्यात आले. त्यानंतर १००० मास्कही वाटण्यात आले. आता वैद्यकीय तज्ज्ञांना निमंत्रित करून आवश्यक त्या औषधांचे वितरण करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

जीवनावश्यक वस्तूंचे संच स्वतःच्या पैशातून तयार करण्याचे काम रत्नागिरीच्या ऑटोमोबाइल असोसिएशनचे अध्यक्ष शकील मोडक यांनी सुरू केले आहे. परिचितांकडूनही त्यासाठी त्यांनी सहकार्य मिळविले, असे असोसिएशनचे सदस्य उसामा सय्यद यांनी सांगितले. मागणीप्रमाणे वस्तू नेऊन देणे चालूच आहे. सचिन वहाळकर यांनी स्थापन केलेल्या अनमोल फाऊंडेशनचे कामही अशा दुहेरी प्रकारे चालू आहे. हेल्पिंग हँड्समध्ये सहभागी होऊन घरोघर जिन्नस पोहोचविण्याचे काम ते करतातच. शिवाय जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना सायंकाळी पोळीभाजीची पाकिटे पुरवितात. आतापर्यंत ७०० पाकिटे त्यांनी पुरविली आहेत.

हेल्पिंग हँड्समध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक संस्थेचे काहीना काही कार्य आधीपासून सुरू आहे. करोना संकटात हातात हात घालून एकत्रित कार्य करण्याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. पण या काळातही त्यांची नेहमीची कामे थांबलेली नाहीत. मनोरुग्णांचे संगोपन करण्यासारखे अवघड कार्य करण्यासाठी राजरत्न प्रतिष्ठानने स्वतःला वाहून घेतले आहे. दाढी आणि केस वाढलेला, घाणेरड्या कपड्यातला, हातवारे करणारा माणूस पाहिला की 'वेडा आहे' म्हणून सामान्य माणसे चटकन

'हेल्पिंग हँड्स'मध्ये सहभागी व्यक्ती, संपर्क क्रमांक आणि संस्था

१) वल्लभ वणजू - ८२७५२७१४७१ - महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
२) श्री. जितेंद्र शिगवण - ८६००३७८१४५ - स्वराज्य संस्था
३) जितेंद्र शिंदे - ९२८४४३१८८९ - रत्नदुर्ग माउंटेनिअर्स (अध्यक्ष, गणेश चौघुले)
४) परेश कुमठेकर - ८२०८५६८५४१ - शिरगाव हेल्पिंग हॅण्डस ग्रुप (अध्यक्ष - सुभान तांबोळी)
५) कौस्तभु दीक्षित - ९९६०५०३५६० - अभाविप (अध्यक्ष, राहुल राजोरिया)
६) समीर करमरकर - ९४२२४३०८०५ - अनुलोम (अध्यक्ष, स्वप्नील सावंत)
७) अमित सावंत - ८२७५४५५४६५ - प्रयत्न प्रतिष्ठान
८) वल्लभ केनवडेकर - ८९५७९५८६५८ - बजरंग दल
९) गजानन करमरकर - ९४२२०१०९३० - आरएसएस
१०) दिलावर कोंडकरी - ७५८८२२०६५३ - संकल्प युनिक फाउंडेशन (अध्यक्ष, शकील गवाणकर)
११) अभिजित भट - ९४२१६२१२१७ - कीर्तनसंध्या (अध्यक्ष, अवधूत जोशी)
१२) समीर काळे - ९३७२९४००६१ - घाणेकर आळी मित्रमंडळ (अध्यक्ष, आशीष खेर)
१३) कौस्तुभ जोशी - ९४२०२७४३०२ - ब्रह्मरत्न, रत्नागिरी
१४) सुहास ठाकुरदेसाई - ९८२२२९०८५९ - जनजागृती संघ (अध्यक्ष, कौस्तुभ सावंत)
१५) देवेद्र वणजू - ९४२१०९००९९ - वैश्य युवा, रत्नागिरी (अध्यक्ष, वीरेंद्र वणजू)
१६) परेश प्रताप साळवी - ९६०४१४६८३० - रोटरी क्लब, रत्नागिरी (अध्यक्ष सचिन चंद्रकांत शिंदे)
१७) शकील इस्माईल मोडक - ९८६०८६४६४६ - ऑटोमोबाइल असोसिएशन
१८) सचिन वहाळकर - ९१३०९५१३५८ - अनमोल फाउंडेशन (अध्यक्ष सचिन करमरकर)
१९) . मोहम्मद विजापुरी - ९८९०२९७०७९ - जिल्हा हज कमिटी
२०) अब्दलु करीम मजगावकर - ७०२०१३१७१९ - खैर उम्मद फाउंडेशन
२१) जैद पावसकर - ८८८८६०३९०६ - पावसकर ब्रदर्स (अध्यक्ष, मोसीन पावसकर)
२२) धीरज पाटकर - ८३९०७६४४६४ - जिद्दी माउंटेनीअरिंग
२३) अभिजित गिरकर - ९८५०४४४६३४ - श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान (अध्यक्ष, सौरभ मुळ्ये)
२४) जयेश दिवाणी - ९९६०६४९३३३ - रोटरी क्लब मिडटाऊन
२५) सचिन शिंदे - ८००७८४११११ - राजरत्न प्रतिष्ठान
२६) नंदकिशोर चव्हाण - ८३२९३३७३३९ - भारतरत्न प्रतिष्ठान
२७) राजेश नेने - ९२२६३८६४२६ - माउंटेनिअर्स असोसिएशन
२८) संदेश शहाणे - ९८९०८५९४७५ - आरएसएस (अध्यक्ष, श्रीरंग प्रभुदेसाई)
२९) योगेश शिंदे - ७५८८१३८५१२ - जनजागृती संघ (अध्यक्ष, धीरज भानुशाली)

लॉक डाऊनमध्ये दिव्यांगांचे जगणे करू सोपे...

करोनाविषयक संचारबंदीमुळे सर्वजण लॉक डाऊन झाले आहेत. घरांत बंदिस्त झाले असले, तरी सर्वसामान्य लोकांना मन रिझविण्यासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत. मात्र दिव्यांगांची त्यातही मतिमंदांची मोठी समस्या या काळात निर्माण झाली आहे. तिला कसे तोंड द्यावे, याविषयीचा लेख.

लॉकडाऊन दरम्यान काही सर्वसाधारण माणसं प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत नाहीत. त्यांना खूपदा प्रेमाने, दम देऊन किंवा सक्तीने घरी राहण्याच्या सूचना द्याव्या लागतात. त्या सूचनांचे पालन करणे सर्वसामान्य लोकांना शक्य तरी होते. मात्र या काळात दिव्यांग विश्वात विशेषतः मतिमंद स्वरूपाच्या दिव्यांग मुलांच्या समस्या खूप मोठ्या प्रमाणामध्ये उद्भवायला सुरुवात झाली आहे. कोणतीही एक मोठी समस्या आली की त्या समस्येच्या आजूबाजूने येणाऱ्या इतर समस्या मोठ्या समस्येमुळे कदाचित थोड्याफार प्रमाणात मागे राहतात. अगदी याच पद्धतीने सर्वसाधारण समाजाच्या हाल-अपेष्टा, त्यांच्या समस्या सोडवता सोडवता, समाजातील काहीसा दुर्लक्षित भाग म्हणजे दिव्यांगांचे विश्व.

दिव्यांगांच्याही काही समस्या आहेत, त्या सोडवण्यासाठी आपल्याला पुढे सरसावले पाहिजे. त्यांना सरकारने अन्नपाण्याची व्यवस्था किंवा आर्थिक मदत तर जरूर केली आहे, परंतु त्यांच्या वर्तनसमस्याही वाढू लागल्या आहेत. यादरम्यान ग्रामीण भागातील दिव्यांग एखाद्या वेळेला सहज लॉक डाऊन निभावून नेतील, परंतु जेथे दाटीवाटीने लोकवस्ती आहे, तेथे एखाद्या फ्लॅटमध्ये दहा दहा-बारा बाराजण राहत असतील आणि तेथे असे मतिमंद मूल असेल, तर त्यांच्या वर्तन समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या दिसतात. किंबहुना शहरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे अनेक प्रश्न मोठ्या प्रमाणात जाणवून येत आहेत. काही विद्यार्थी अत्यंत अस्वस्थ झालेले आहेत. घरात कोणाचा ऐकत नाहीत. आरडाओरडा करत आहेत. तोडफोड करत आहेत. अशा मुलांना सांभाळणे त्या कुटुंबाला, त्या पालकांना खूप कठीण जात आहे.

ही खूप चिंताजनक आणि विशेष लक्ष देण्याची बाब आहे. याकरिता पालक, समाज आणि आम्ही सर्व

त्याच्यापासून बाजूला होतात. पण अशा मनोरुग्णांचे केस कापून, त्यांना अंघोळ घालून नीटनेटके बनविण्याचे कार्य राजरत्नच्या सदस्यांच्या रूपाने आपल्यातच सहजपणे वावरणारे ६० देवदूत करतात. आजही करोनाच्या संकटात हे काम चालू आहे. मनोरुग्णांच्या या सेवेसाठी महिला आणि पुरुषांच्या स्वतंत्र तुकड्या आहेत.

सचिन शिंदे यांच्या राजरत्न प्रतिष्ठानप्रमाणे नंदकिशोर चव्हाण यांची भारतरत्न प्रतिष्ठान ही संस्थासुद्धा सामान्यांच्या ध्यानात न येणाऱ्या एका समाजघटकासाठी झटत असते. भारतीय लष्करातील विद्यमान आणि माजी सैनिक हा तो घटक. सैनिकांना निवृत्तीनंतर कुठेही सिक्युरिटीची नोकरी मिळते, 'एक्स सर्व्हिसमन' म्हणून खास सवलती मिळतात. त्यामुळे त्यांना कुठल्या समस्या असणार? तसा प्रश्न माजघरात बसून अमेरिकेच्या राजकारणावर बोलणाऱ्या तुम्हा-आम्हाला पडले असतील. पण देशाच्या भूमीचे रक्षण करणाऱ्या शूर जवानांच्या मूळ गावातील जमीन एका सरपंचाने कशी हडप केली, त्याचा किस्सा नंदकिशोर चव्हाण यांनी सांगितला. हाडे गोठवणाऱ्या थंडीत बर्फ तुडवत दऱ्याखोऱ्या पालथ्या घालणाऱ्या पराक्रमी सैनिकांची राहती गावे कोकणात कुठल्या तरी डोंगरावर असतात. तेथे पोहोचायचे असेल, तर दोन तास चालतही जावे लागते. शहीदांबद्दल समाजमाध्यमावरून चित्रे पाठवून देशभक्तीचे प्रदर्शन लाखो लोक घडवितात. पण त्यांच्या वीरपत्नीकडे वयाच्या ऐंशिव्या वर्षी पेन्शन देण्यासाठी जाणे त्यापैकी कोणालाही जमत नाही. आपण सैन्यात जावे, ही महत्त्वाकांक्षा बाळगणारे नंदकिशोर चव्हाण, वसीम नाईक वगैरे तरुण भरती होऊ शकले नाहीत. पण सैनिकांचे हे प्रश्न सोडविण्यासाठी ते सरसावले आहेत.

राजेश नेने यांची 'माउंटेनिअर्स असोसिएशन' ही संस्था, गणेश चौगुलेंकडे नेतृत्व असलेली 'रत्नदुर्ग माउंटेनियर्स' आणि 'जिद्दी माउंटेनिअरिंग' ही धीरज पाटकर यांच्या नेतृत्वाखालची संस्था यांना करोनाची काय भीती? खाली नजर जाताच डोळे गरगरावेत, अशा गगनभेदी सुळक्यांवर सहज चढाई करणारी ही मंडळी नेटाने सहभागी झाली आहे नागरिकांच्या सेवामोहिमेत.

चार पैसे गाठीला लावलेलेस राहणीमान उंचावल्यानंतर म्हणा, व्यावसायिक एटिकेट्सचा भाग म्हणा, अलिप्त राहणारे रोटरी क्लबचे सदस्य सामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यात सदैव पुढे असतात. वर्षभर स्वतःच्या पैशाने ते बरीचशी कामे करतात. कुठे पाण्याची टाकी बसवून दे, कुठे शाळेला संगणक प्रदान कर असे काम चालूच असते. रत्नागिरी आणि रत्नागिरी मिडटाउन असे दोन रोटरी क्लब रत्नागिरीत आहेत. दोन्ही क्लब या कार्यात सहभागी झालेले आहेत.

कीर्तनसंध्या ही आणखी एक अशीच वेगळी संस्था गेल्या दहा वर्षांपासून रत्नागिरीत कार्य करते. राष्ट्रीय विषयांवर देशाभिमान जागृत करणारी कीर्तनमालिका दरवर्षी या संस्थेतर्फे सादर केली जाते. दरवर्षी पाच दिवसांचा हा महोत्सव उत्तरोत्तर रंगत जातो. कीर्तन म्हणजे मंदिरातला कमी श्रोत्यांमध्ये उरकून टाकला जाणारा कार्यक्रम नव्हे, तर रत्नागिरीच्या प्रमोद महाजन क्रीडा संकुलात कीर्तनाला पाच हजाराहून अधिक श्रोते उपस्थित राहू शकतात, हे सिद्ध करणारा अतिभव्य स्वरूपात साजरा केला जाणारा कार्यक्रम आहे, हे या संस्थेने सिद्ध केले आहे. अवधूत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू असलेल्या या संस्थेचे वेगवेगळ्या व्यवसायात स्थिरावलेले कार्यकर्ते हेल्पिंग हॅण्डसमध्ये सामावले गेले आहे.

'ना उम्र कि सीमा हो, ना जन्म का हो बंधन' हे इथे अक्षरशः खरे झाले आहे. अठरा-वीस वर्षांच्या तरुणांपासून एक-दोन वर्षांवर निवृत्तीची तारीख असणारे किंवा त्याच्याही पुढच्या वयाचे कार्यकर्ते अथक परिश्रम करत आहेत. जातिधर्माच्या पलीकडे जाऊन समान भावनेने मदतीला धावत आहेत. अनेक वर्षांपासून त्या त्या कार्यक्षेत्रात सिद्ध केलेल्या कर्तबगारीची पुण्याई पाठीशी असलेल्या संस्थांचे बॅनर गुंडाळून ठेवून हेल्पिंग हॅण्ड्स या एकाच ध्वजाखाली खांद्याला खांदा लावून जमले आहेत. त्यात हज कमिटी आहे, नागरिकांचा जनजागृती संघ आहे, एका कुटुंबाच्या पावसकर ब्रदर्सची तुकडी आहे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे कार्यकर्ते आहेत, स्वराज्य संस्था ही तळागाळातल्या माणसांसाठी कार्य करणारी संस्थाही आहे. ***हेल्पिंग हॅण्ड्सच्या कार्याची नागरिकांनी दखल घेतल्याचे हे कार्यकर्ते सांगतात. शे-दीडशे रुपयांचा माल पोहोचविण्यासाठी दुकानदारही त्यांना त्रास देत नाहीत. वाट पाहतात. हा, तशातही तीन-तीनशे वस्तूंची यादी देणारा एखाद-दुसरा ग्राहक भेटतो. कधीतरी सकाळी सहा वाजता टूथब्रशची मागणी होते आणि एखादा तर तंबाखूची मशेरीही मागतो. पण कार्यकर्ते या साऱ्या गरजा भागवतात.***

खरे म्हणजे व्यक्ती दोन संस्था तीन हे स्वभावचित्र बुद्धिवंतांच्या शहरात नेहमीच नक्की दिसते. पण रत्नागिरीत सगळेजण एकत्र आले आहेत. त्यांची संख्या मोजता येईल, पण त्यांच्या सेवाभावाचे, एकोप्याचे निरपेक्षतेचे, प्रसिद्धीपासून दूर राहण्याच्या गुणाचे, मातीवरच्या प्रेमाचे मोजमाप करता येणार नाही. ते त्या सर्वांच्या रक्तात भिनलेले आहे. शरीराच्या कणाकणात भरलेले आहे. इतक्या कणांपर्यंत पोहोचण्यात करोनचे विषाणू कमी पडतील आणि ही लढाई आपण नक्कीच जिंकू!

विशेष शिक्षक यांनी मिळून काम केले पाहिजे. यामागे एक कारण असे आहे की, हे जे दिव्यांग विद्यार्थी आहेत किंवा दिव्यांग मुले किंवा दिव्यांग व्यक्ती आहेत, त्यांना हा करोना व्हायरस काय आहे? आपण का घरात आहोत? आपल्याला बाहेर जायला का मिळत नाही? इतके दिवस सगळे बंद-बंद असल्यासारखे का जाणवते? या गोष्टी समजत नाहीत. त्यातील काही दिव्यांगाचे ठीक आहे, ते थोडेफार समजतात आणि जाणूनही घेत आहेत. परिस्थितीशी निभावून नेत आहेत. मात्र बहुतांश विद्यार्थी असे आहेत की ज्यांना समोर काय चालले आहे, काहीच कळत नाही. त्यांना स्वतःचीसुद्धा ओळख नाही. अशा मुलांना त्यांच्या पालकांना घरात थांबवून ठेवणे, त्यांचा सांभाळ करणे खूप कठीण होऊन बसले आहे.

काही ठिकाणी यापेक्षा उलट परिस्थिती आहे. खूप मोठ्या कुटुंबांमध्ये सतत, दिवस-दिवस, सगळेजण घरात लॉक डाऊन झाल्यामुळे या विद्यार्थ्यांना काही वेळेला त्रासही दिला जातो. घरात खूप माणसे आणि गजबजाट अशा मुलांना नको असतो. म्हणून ती मुले आतातायीपणा करत असतात. अशीसुद्धा एक परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. या व्यक्तींना समजून घ्यावे. त्यांनाही आपल्या कामांमध्ये सामावून घ्यावे. त्यांची टिंगल टवाळी करू नका. ते आपल्यासारखे, सर्वसामान्यांसारखे वागले असते तर दिव्यांग म्हणून ओळखले गेले नसते किंवा बौद्धिक अक्षम नसते.

लॉक डाऊनच्या कालावधीमध्ये या सर्वांकरिता आपण काही करू शकतो किंवा आपण खूप काही करू शकतो. त्याचा थोडक्यात तपशील असा आहे :

त्यांच्याकरिता या मुलांच्या अधिक जवळ असणारे त्यांचे पालक त्यांचे आई-वडील, त्यांची भावंडे, त्यांच्या घरातील इतर पालक मंडळी या सर्वांनी संपूर्ण दिवसभराचा प्रत्येकी १ तास त्या विद्यार्थ्यांबरोबर किंवा त्या मुलाबरोबर काढला तर त्यांना कंटाळा येणार नाही आणि प्रत्येक जण त्यांच्या वर्तनसमस्यांमुळे कंटाळणार नाही.

ज्या कुटुंबामध्ये केवळ आई-वडील भावंडे असतील, त्यांनी आळीपाळीने एकेक तास या मुलांकरिता दिला पाहिजे. या एक तासामध्ये विविध ॲक्टिव्हिटी आपण घेऊ शकतो. वाटाणेशेंगदाणे सॉर्टिंग,कलरिंग, स्टोरी टेलिंग, डान्स, योगा, सुई दोरा ओवणे, धाव धागा घालणे, मायक्रोमीसारख्या जाड दोऱ्यांना एकेरी गाठ बांधणे, शेंगभाज्या सोलणे, कचरा काढणे, भांडी स्वच्छ घासणे, भांडी जाग्यावर लावणे, लादी पुसणे, कपड्यांच्या घड्या घालणे अशा दिवसभराच्या अनेक कामांपैकी त्यांचे मनोरंजन होईल अशा स्वरूपाचे काम निवडून त्यांचे दैनंदिन वेळापत्रक बनवले, तर अशा मुलांना सांभाळणे खूप सोयीस्कर होईल. नॉर्मल मुलांच्या वर्गामध्ये प्रत्येक विषयाला जसा एक वेगळा शिक्षक असतो, अगदी त्याप्रमाणेच घरातल्या घरात आपण आपल्या पाल्याचा वर्ग घेऊ शकतो. दिवसभरात त्याचे आई-बाबा ,भाऊ, बहीण,आजी-आजोबा, काका-काकी हे सगळे वेगवेगळे शिक्षक होऊ शकतात. शिवाय या सर्व पालकांचाही वेळ सत्कारणी लागेल.

एक नवीन प्रोजेक्ट पालकांना हाताळायला मिळेल. या मुलांसोबत काम करता करता या पालकांनाही एक वेगळा अनोखा आनंद मिळेल. मुलाला पालकांचे प्रेम मिळेल. पालकांनाही अशा बौद्धिक अक्षम मुलाबरोबर काम करण्याचा एक वेगळा आनंद मिळेल. जे आम्ही विशेष शिक्षक करत असतो, अगदी तसेच. या पालकांनी शिकवलेले आवडले तर तो पालक तो तास जिंकला समजायचे आणि त्या पालकांनी शिकवलेले त्या पाल्याला आवडले नाही, तर आपण हरलो असे न समजता आणखी नवीन प्रयत्न करून नव्याने सुरुवात करून त्याच्या आवडीचे नवे काम त्याला शिकवायचे. हे एक वेगळं चॅलेंज असते. याने या मुलासोबत काम करणाऱ्या व्यक्तींची सहनशीलता वाढते आणि स्वभावामध्ये वर्तनामध्ये बदल निर्माण होतो.

टीव्ही बघणे, गाणी ऐकणे, प्रार्थना म्हणणे, श्लोक म्हणणे, दिवेलागणीची वेळ हेही त्या दैनंदिन वेळापत्रकामध्ये असावे. यामध्ये त्या मुलांचा सहभाग जरूर घ्यावा.

जेवण, नाश्ता याकरिता या मुलांना एकेक तास द्यावा. त्यामध्ये स्वतःचे स्वतः स्वतः खाणे, आपले खाऊन झाल्यावर उष्टावळ काढणे, आपले ताट स्वच्छ करणे आणि पुन्हा नियोजित ठिकाणी ठेवणे आदी कामांचे नियोजन त्यामध्ये असावे.

रोजची पंधरा मिनिटे या मुलांना करोना म्हणजे काय, त्याबद्दल घ्यायची काळजी, लोक बाहेर का जात नाहीत, हे त्यांच्या भाषेमध्ये त्यांना समजावून सांगायचा प्रयत्न करायचा. जमले तर यामध्ये फ्लॅश कार्डचा उपयोग करायला हरकत नाही. एखाद्या कागदावर मोठे चित्र काढून, त्यांना करोना वायरस कसा आहे ते दाखवून तो आपल्याला कसा त्रास देतो आहे, हे त्यांना समजावून, ॲक्टिंग आणि हावभावांद्वारे समजावून देणे यातून त्यांना सद्यःस्थितीची जाणीव करून द्यावी.

मराठी भाषा किंवा मातृभाषेमध्ये त्यांना बातम्या ऐकायला लावणे, त्यांना समजेल अशा भाषेमध्ये अनुवाद करून सांगणे.

फ्लॅटच्या खिडकीत, फ्लॅटच्या गॅलरीत, अंगणात, टेरेसवर छोटासा फेरफटका मारून आणणे, तोही काळजीपूर्वक, मास्क लावून, सोशल डिस्टन्स ठेवून. घरात गेल्यावर मात्र डेटॉल किंवा सॅनिटायझरच्या साह्याने पुन्हा हात-पाय स्वच्छ धुणे.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विद्यार्थ्यांचे कोणी विशेष शिक्षक किंवा निदेशक असतील, तर त्यांचा वेळ घेऊन किंवा त्यांना विनंती करून किंवा या विशेष शिक्षकांनी किंवा निदेशकांनी स्वतःहून पुढे होऊन या विद्यार्थ्यांना व्हिडीओ कॉल करणे किंवा साधा फोन करणे, व्हॉइस कॉल करणे आणि या विद्यार्थ्यांशी बोलणे, संवाद साधणे आवश्यक आहे. यातून त्यांच्या वर्तनसमस्या बहुतांशी प्रमाणात कमी होतील. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण हे विद्यार्थी जसे त्यांच्या पालकांवर प्रेम करत असतात किंबहुना त्यापेक्षा जास्तच आपल्या विशेष शिक्षक किंवा निदेशकांशी मनमोकळे असतात. त्यांनी सांगितलेल्या सूचना ते ऐकतात. त्यातून त्यांच्या वर्तनसमस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात.

नातेवाईकांशी व्हिडीओ कॉल किंवा व्हॉइस कॉल करून संपर्क साधून देणे, त्यांच्याशी गप्पा मारणे हा एक उपाय आपण करू शकतो. त्यातून या विद्यार्थ्यांना आपल्याशीही कुणीतरी बोलते आहे, असा आधार वाटेल आणि वर्तनसमस्या कमी होतील. या मुलांना व्हिडीओ कॉल किंवा अँड्रॉइड मोबाइल वापरणेही आता येऊ लागले आहे.

या विद्यार्थ्यांच्या विशेष शिक्षकांनी किंवा निदेशकांनी या विद्यार्थ्यांची व्हिडीओ कॉन्फरन्स घेतली तर मोकळ्या वेळामध्ये एकाच वेळी आपल्या वर्ग मित्र-मैत्रिणींशी हे विद्यार्थी संवाद साधू शकतील. सर्वांना भेटल्याचा त्यांना वेगळा आनंद मिळू शकतो. या विद्यार्थ्यांपैकी कोणी स्पीचलेस विद्यार्थी असतील तरी त्यांना आपण काहीतरी ऐकल्याचा, बघितल्याचा एक वेगळा आनंद मिळतो. या विद्यार्थ्यांना व्हिडीओ कॉन्फरन्स कॉलवर संवाद साधणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे सांगणे आणि ओळखायला लावणे यातही त्यांचा वेळ जातो. त्यांना आपण सर्वांना भेटल्याचा आनंद मिळतो.

आजूबाजूला राहणाऱ्या शेजाऱ्यांनीही या विद्यार्थ्यांना समजून घेणे गरजेचे आहे. त्यांची विनाकारण मस्करी करू नये. तेही आपल्या समाजाचा विशेष भाग आहेत, हे त्यांनी ध्यानात ठेवावे आणि अशा पालकांना आणि पाल्याला सहाय्य करावे.

लॉक डाऊनच्या काळात प्रशासनाने किंवा इतर संस्थांनी अशा गरजू आणि गरीब दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता काही मदत केली असेल किंवा वेबसाइट असेल तर त्याचा लाभ या विद्यार्थ्यांना मिळवून देऊन सहकार्य करावे.

या विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवसभरामध्ये केलेल्या कामाची एका रफ वहीमध्ये नोंद करून ठेवावी. या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची पालक दखल घेतात याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. ज्या दिवशी ही मुले खूप छान काम करतील, त्या वेळेला सर्व कुटुंबीयांनी मिळून त्याला शाबासकी देणे, त्याला काहीतरी गोडधोड खायला देणे, अगदी साखर हातावर टेकवली तरी चालेल, असे छान बक्षीस मिळाल्यावर ते मूल खूप चांगले वागू लागेल.

असे केल्याने दिव्यांग व्यक्तींना लॉक डाऊनच्या काळामध्ये प्रशासनाच्या नियमानुसार घरात राहायला आणि नियमांचे पालन करायला हातभार लावू शकतो.

– सौ. प्रिया अमृत गांधी
विशेष शिक्षिका, रत्नागिरी

(सौ. प्रिया अमृत गांधी यांचा व्हिडिओ https://youtu.be/hTkBWIL4rOg या लिंकवर पाहता येईल. अशा वेगवेगळ्या व्हिडिओचे अपडेट्स मिळविण्यासाठी साप्ताहिक कोकण मीडियाचे यू-ट्यूब चॅनेल सबस्क्राइब करा. https://www.youtube.com/kokanmediaratnagiri)

वाचक विचार

अघटित आणि अकल्पित!!!

व्हॉट्सअॅप आणि फेसबुकवर सर्वाधिक चर्चिली गेलेली 'बाबा तुला भेटायचंय' ही माझी कविता 'कोकण मीडिया' या साप्ताहिकात छापून आली. (अघटित) ज्या फोटोवरून मला ही कविता सुचली, त्या फोटोऐवजी संपादक महोदयांनी वेगळाच फोटो लावला. (अकल्पित) योगायोगाने माझा एक माजी विद्यार्थी वैद्य प्रणव प्रभू याचा एक लेख त्या कवितेशेजारीच छापून आला. (अघटित) माझ्याआधी त्याने ते पाहिले आणि त्याची यासंदर्भातील प्रामाणिक प्रतिक्रिया फेसबुकवर मला टॅग केली. (अकल्पित)

हा (अघटित) योगायोग मलाही आनंद देऊन गेला. केवळ आपल्या सरांच्या कवितेशेजारी आपला लेख प्रसिद्ध झाला, ही घटना त्याने (अकल्पित) बहुमानाची मानली, हे फारच सुखदायी होते. तुझ्या लेखाशेजारी माझी कविता छापली जाणं हा (अघटित) योगायोग असला तरी माझ्यासाठी ती गौरवाचीच गोष्ट आहे रे प्रणव! असा मेसेज मी त्याला व्हॉट्सअॅपवर पाठवला. त्यावर त्याने अजून काय पाहिजे आयुष्यात अशी (अकल्पित) प्रतिक्रिया नोंदविली.

हे सारेच माझ्यासाठी अघटित आणि अकल्पित होते!!!

– ए. के. मराठे,
कुर्धे, ता. रत्नागिरी
(९४०५७५११६९८)

देव तारी त्याला कोण मारी

बोली : संगमेश्वरी

डॉ. प्रणव अशोक प्रभू
(संपर्क : ९४२१०७३९०७, ८३२९८९७५१५)

एकदा काय झालेला, मी कामासाठी कुडाल्ला गेलो व्हतो. आता कामासाठी म्हणजे घरात तसा सांगितलेला म्हनून, काय समाजलीव? आमचे पावने असतत ना तिकडे, त्यांचा सारखा फोन या या म्हनून, पण आमचा काय काळ, येळ जुलत नव्हता. एक दिवस ठरवला, काय झाला तरी जायचाच.

मग काय सकाली सकाली पयली एसटी पकडली आणि कुडाल्ला आलीला. पावन्याचा लय प्रेम माझ्यावर. बाजारात गेला आनी मोठे बांगडे घेवन आला. तसले बांगडे माझ्या बगण्यात तरी हल्ली नाय. आमच्या थय कांटा आणि बांगडे सगले एकसारकेच, काय समाजलीव? मग आमच्या पावन्याच्या घरकारनीन बांगड्याची मस्त चटणी बनवलीन आनी ढीगभर भातावर वाडून ताट तयार केलेला. ह्या असला प्रेम माझ्यासाठी तरी पयलाच. नायतर आमची घरकारीन 'बांगड्याची चटणी कर' म्हनून सांगितली तर फोडी केलेले बांगडे त्या चटणीत पेवतत, काय समाजलीव?

ता रावदे बाजूला पण खरी गंमत तर पुढे हाय. आम्ही जेवलव आनी मग पावन्याचा निरोप घेतलीला. म्हटला, दिवस फुकट घालवन्यापरीस घरी गेलेला बरा. नायतर पावन्याला उगाच वाटायचा, हा रिकामचोट हाय म्हनून. शेवटी आपली इज्जत आपल्यालाच संबालायला हवी. काय समाजलीव? मग मी पावन्याचा निरोप घेतला आणि एसटी स्टँड गाठला. एसटी स्टँडवर आलीलो खरा पण गाडी तासभर लेट. तरी मला पावना सांगीत होता जरा झोपा. पन माझी झोप म्हनजे कुंभकरनाच्या वरटांग. एकदा काय आडवा झालो मग संद्याकालपातूर डोले उघडायचा नाव नाय. उगाच पावन्यासमोर इज्जत जायला नको. म्हनून मी गप स्टँडवर आलीला. आता झाली खरी पंचाईती. एक-दोनदा वाटला परत पावन्याकडे जाया होवा. पन परत कोण एवढा लांब जानार म्हणून मी स्टँडवरच गप बसायचा ठरवला, काय समाजलीव?

उनाल्याचे दिवस ना ते. म्हनून मी इकडे तिकडे बगीतला. खय फ्यान हाय काय, तर जल्ले सगले फ्यान बंदच. मनात म्हटला, हे फ्यान काय आमच्या सासारवाडीतून आणलेले त्यातले दिसतत. काय म्हायती हाय आमच्या घरी सासुरवाडीतून काय पन वस्तू आली तरी ती जास्त येळ टिकायला हवी म्हनून आमची घरकारीन त्याची कालजी घेते. काय समाजलीव? या सगळा विचार करीत असताना लांब तिकडे कोपऱ्यात एक फ्यान दिसला. मग काय, लगेच तिकडे पलालो. अंगाचा नुस्ता जाळ झालीला. फ्यानची पयली हवा लागली तवा असा काय वाटला की शिमल्यातच आलीलो हाय. नाय म्हणजे लय गार वारा हुता तो काय समाजलीव?

थोडा वेल फ्यानखाली थांबल्यावर बाकावर बसनार तेवड्यात एक परदेशी माणूस जवल आला. ते भारत फिरायला येतत ना, त्यातला. पयली थोडी भीती वाटली. कारन तो माझ्याशी बोलायला यायचा आणि माझा इंग्रजी त्याला कलला नाय तर पंचाईती होयाची. तसा मी त्या येळचा मॅट्रिक नापास. त्यामुले मला इंग्रजी समजाय कधीच कटीन नाय गेला. पन याला कलायला हवं ना? काय समाजलीव? तरीपण तो माझ्या बाजूला बसला आणि बोलायला लागला..

हल्लो मिस्टर...

हाय हाय मी मिस्टर हाय...

बायको घरी असली म्हनून काय झालं? लगीन झालाय म्हणजे मी मिस्टर हाय ना. उगाच खोटा कशाला बोलायचा..

व्हॉट्स युअर नेम?

माय नेम इज नारायणराव बट गावातले वासाडीचे नारू म्हनून हाक मारतत...

व्हॉट...

निक... निक.. नेम नारू

ओहहह नारू, व्हेरी स्वीट नेम!

स्वीट. झो गावातले सगले शिव्या घालताना नारू का म्हनतात ते आता कलला..

व्हॉट....

काय नाय, येस, येस स्वीट!

व्हॉट डू यू डू....

आय डू सुतारकाम लाइक घराच छप्पर, पलंग, खुर्ची..

व्हॉट....

पेंटर.... पेंटर...

ओहहह नाइस...

हो... हो... आता जर अजून काय इचारलन तर माझा काय धड नाय. म्हनून मग मी पन प्रश्न इचारायला सुरवात केली.

व्हॉट नेम...

ओहहह माय नेम इस स्टीव्ह..

या.... या... व्हॉट डू....

प्रोफेशनली आय एम अ डॉक्टर..

या... या... मग दवाखाना सद्या बंद हाय काय?

सॉरी...

युअर क्लिनिक क्लोज.....

सॉरी.... सॉरी.... आय एम अ प्लॅन्टस डॉक्टर लाइक ट्री, बुश एटसेट्रा....

हा.... हा.. म्हनजे तू शेतकरी हायस होय. जल्ला आमच्याथय त्यास इंग्रजीत फार्मर म्हनतात.....

ओहहह बट बेसिकली आय एम नॉट अ फार्मर...

शिरा पडली तुज्यावर नाय ती.. नक्की हायस तरी कोन काय कलत नाय...

ओके... ओके... ह्याड लंच...

येस. येस... लंच... लंच... बांगड्याची चटणी आनी भात.. राइस राइस!

ओके... ओके..

अँड यू....

नो , टुडे इज माय फास्टिंग डे...

हा... हा... आज शनिवार ना जल्ला माझ्या लक्षातच नाय. आता घरात कलला तर जीव घेतील. नशीब हा भेटला. नाय तर जीव नको करनार होते घरातले. परत नदीवर जाऊन अंगुल करायला लावनार ती येगलीच. देव पावला बा तुझ्यामुले...

व्हॉट...

त्याचा कसाय टुडे इज अवर फॅमिली फास्टिंग डे अँड आय इटिंग बांगडा चटणी... सो मिसेस टेक लाटना अँड रनिंग मी नदीवर..

ओहहहह...

ओहहह नाय आफ्टर द्याट नुस्ता आयगो.... उयगो... अँड आंबेहलद..

ओहहह...

नशीब बाबा तू हनुमान होऊन आलास आनी माझा जीव वाचवलास.. देव तुज भलं करो...

व्हॉट....

काय नाय यू आर गॉड फॉर मी!

ओहहहज थँक्स बट व्हाय....

तुला नाय कलनार ते... नॉट...नो....

व्हॉट...

ती बग माजी गाडी आली. मी जातो आता. चल थँक्स... थँक्स....

ओहहह बाय.... बाय..

हा... हा... थँक्स...

बगलव, मी तुमाला सांगीत नसतो या जगात देव हाय म्हनून पन तुमचा इसवास नाय माजावर आता तरी बसल इसवास. ठेया इसवास नायतर माजासारखा होईल काय समाजलीव?

... म्हणून घातला करोनाने आपल्याला जबरदस्त विळखा!

परवा गावी गेलो, तर आईने एक भला मोठा वाळलेला ओंडका अंगणात आणून टाकला.

''बाबू, ती कोनाड्यातली कुऱ्हाड घे आणि ह्या टोणक्याचे भेतळे कर...'' असं सांगून ती आता गोठ्यात एकमेव उरलेल्या गाईचं शेण काढण्याला निघून गेली. मी कुऱ्हाड घेऊन बाहेर आलो. त्या ओंडक्याचे दोन-तीन सळपे निघाले असतील, पण त्या सुरुवातीच्या दहा पंधरा मिनिटांतच मी अगदी घामाघूम झालो. कुऱ्हाड तिथेच टाकून मी दम टाकत पेळेवर बसलोस तर गोठ्यातून आई बाहेर आली. ''माका आता अगोदरसारखी कामां नाय जमत... भांगल्याक बोलावून टोणक्या फोडून घेवया...'' असं म्हणून मी टॉवेलने अंग पुसत घरात गेलो. तांब्याभर पाणी पिऊन बाहेर आलो तोवर खुद्द आईने अर्धाअधिक ओंडका फोडून मोकळा केला होता. या उतारवयातही आईच्या अंगातली उमेद बघून मला आईचं कौतुक वाटलं.

बालपणी आम्ही गावी खूप कष्ट करायचो. पावसाळ्यात शेतीची सगळी कामं आम्हीच करायचो. पावसाळ्यानंतर सकाळी आणि संध्याकाळी घरामागच्या आडव्यात जाऊन लाकडांचे दोन दोन भारे आणून त्यांचा पावसाआधी 'माच' करायचो. सुट्टीच्या दिवशी आम्ही वाडीतील मुलं ठरवून एकेकाच्या माचातली टोणकी फोडून त्या सळप्यांचा मोठा ढीग करायचो. सगळी नेमून दिलेली कामं आटोपल्यावर घरच्यांच्या परवानगीने बिरामणाच्या तळ्यात उड्या घेत मनसोक्त डुंबायचो. एकंदरीत आमच्या तेव्हाच्या जीवनशैलीत आम्हाला आराम असा कधी नव्हताच. मात्र तशा जीवनशैलीमुळे त्या काळात आम्ही शरीराने 'किरकोळ' दिसलो तरी तब्येतीने 'ठणठणीत' होतो. त्या काळात आमच्या शारीरिक श्रमांमुळे ओघळणाऱ्या घामाच्या धारांमुळे कोणत्याही रोगाच्या विषाणूला आमच्या शरीरात प्रवेश करणं शक्य झालं नाही.

मात्र आज सर्वत्र परिस्थिती खूप बदलली आहे. नोकरीधंद्याच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक व्यक्तीची मिळकत वाढल्याने माणसं खूप सुखचैनी व विलासी बनली आहेत. जीवनात सुखसोयी वाढल्याने दररोजच्या आहाराचं स्वरूप व संतुलनही पार बिघडून गेलं आहे. कधी काळी आपल्याच शेतात पिकणारं धान्य मोठ्या अभिमानाने खाणाऱ्या आम्हाला आता 'घरातलं' खाणं 'आऊटडेटेड' वाटतं. त्यापेक्षा बाहेर उपलब्ध होणारं 'चमचमीत' आणि 'फास्ट फूड' आपल्याला चवीने खावंसं वाटतं. मात्र अशा अन्नपदार्थांमध्ये मिसळल्या गेलेल्या घातक पदार्थांकडे आपण जाणीवपूर्वक कानाडोळा करतो.

सध्याच्या बदललेल्या राहणीमानामुळे आपण आरोग्यदृष्ट्या अधिक कमकुवत बनत चाललो आहोत. कोणतेही शारीरिक कष्ट करण्याची आमची इच्छाशक्ती कधीच मरून गेली आहे. छानछोकी आणि व ऐषारामी जीवनशैलीमुळे आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती दिवसागणिक कमी होत चालली आहे, याचं आम्हाला भानही नाही. आता अशीच जीवनशैली अंगवळणी पडलेले आम्ही तिच्यापासून दूरही जाऊ शकत नाही ही आमची आजची अगतिकता आहे.

मात्र यामुळेच आपण आज अनेक आजारांच्या अजगरी विळख्यात घट्ट घट्ट आवळले जात आहोत. आज जगातल्या प्रत्येकाची झोप उडवलेल्या 'करोना' महामारीने जगभरात इतक्या प्रचंड वेगाने हात पाय पसरले आहेत, याचं सर्वांत महत्त्वाचं कारण म्हणजे आपली दिवसेंदिवस कमी होत चाललेली रोगप्रतिकारक शक्ती हेच आहे. आपल्या सभोवतालच्या निसर्गाने मान्य केलेली जीवनशैली आपण तशीच पाळली असती तर या 'करोना'ने आजच्याएवढं अक्राळविक्राळ रूप धारण केलं नसतं. मात्र आपण सर्वांनी 'निसर्ग संहिता' पायदळी तुडवल्यामुळेच करोनासारखे संसर्गाचे आजार आज जगभर पसरले आहेत.

अजूनही वेळ गेलेली नाही. निसर्गावर मात करण्यापेक्षा आपण निसर्गनियम पाळायला सुरुवात करू या. निसर्गाचे पुजारी होऊ या.... आणि.... याची सुरुवात स्वतःपासून करू या!

– बाबू घाडीगावकर,
जालगाव, दापोली
(संपर्क : ९४२१७९५९५५)

अनुश्रुती गृ हो द्यो ग
रसिन foods
अस्सल कोकणच्या चवीचे पदार्थ
* मोदक पीठ
* थालीपीठ भाजणी * उपवासाची भाजणी
* वड्यांचे पीठ * मेतकूट..... आणि इतर बरंच काही!
संपर्क : 9850893619. e-mail : anushrutigruhodyog@gmail.com
Website: https://anushrutigruhodyog.business.site/
Facebook : https://www.facebook.com/RasinFoodsbyAG
कुसुमसुधा, ६९७, रामचंद्रनगर, खेडशी, रत्नागिरी-४१५६३९
fssai Lic. No. : 11519025000168

करोना संकट टळल्यावर पुन्हा जाऊ निसर्गाकडे...

विकास आणि प्रगतीच्या नावाने पृथ्वीची जडणघडण उद्ध्वस्त करणे, चारही आवरणे प्रदूषित करणे, यातून जैविक विविधता नष्ट होणे, कार्बन उत्सर्जन वाढून तापमानवाढ होणे, यामुळे भयंकर विषाणूंचे आक्रमण होत आहे. त्यात माणसाची सत्ताकांक्षा जैविक युद्धासाठीच्या प्रयोगांची भर घालत आहे. सध्याचे करोनाचे संकट त्याचाच एक भाग आहे.

गेल्या मान्सूनपासून भारतीय जीवन आणि पृथ्वीरक्षण चळवळीतर्फे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दीड-दोन तासांच्या व्याख्यानात समजावून, पर्यावरणाच्या रूढ मर्यादित कल्पनांमधून बाहेर काढणे चालू आहे. हे विद्यार्थी म्हणत की, आम्हाला याची थोडीही कल्पना नव्हती. आम्हाला जिवंत राहायचे आहे. आयुष्य जगायचे आहे. आम्हाला शेती शिकवा. मातीची आणि बांबूची घरे, आम्ही चरखा हातमाग शिकू.

त्यांना डहाणूला, १५ वर्षांपूर्वी बांधकाम व्यवसाय आणि शहर सोडून नरपड या आपल्या गावी शेती करून राहणाऱ्या कुंदन राऊत यांच्या शेतात, शेतीत भाग घेऊन शेती शिकवणे सुरू आहे. केरळला लॉरी बेकर सेंटरमध्ये माती आणि बांबूच्या घरांचे शिबिर घेतले. माझी पत्नी प्रणाली पूर्ण जानेवारी महिन्यात रोज बुनकर केंद्रात गेली आणि तिने हातमाग शिकून घेतला. प्राथमिक शाळेत शिक्षिका असलेल्या राजश्री चोचे यांच्याकडून ती आणि मी आधी चरखा शिकलो आहे. दोन वर्षांपूर्वी मणि भवनने चरखा शिकवण्याची विनामूल्य व्यवस्था केली होती. चोचे शिकवतात.

आशीष मोकल हा कार्यकर्ता एक वर्षापूर्वी उरण शहर सोडून कायमचा रायगडमधील गोठेघर या गावात शेती करून जगण्यासाठी गेला. धूरविरहित मातीची काटक्या जाळण्याची चूल तो वापरतो. असे अनेक कार्यकर्ते आहेत. आता याचा तातडीने विस्तार करायचा आहे. यात कोणतेही मागासपण नाही. ही शाश्वतता आहे. जीवन रक्षण आहे.

हे सर्व दीड-दोन तास किमान दिल्यावर माणसे समजून घेऊ शकतात.

तथाकथित प्रगत तंत्रज्ञान आणि अमाप पैसा, प्रयोगशाळा यामुळे मानवजात, विषाणू किंवा तापमानवाढ-हवामान बदलापासून वाचवता येईल, असे बिल गेट्ससारख्यांना वाटते. पण तसे शक्य नाही. मानवजात आणि जीवसृष्टी, फक्त पृथ्वीला मान्य अशा जीवन पद्धतीने वाचवता येईल. ती पद्धत एकतर जंगल किंवा उद्योग येण्याआधीचे कृषियुग असू शकते.

शाश्वत जीवनाचा निकष लावला तर विकासाची व्याख्या उलट डोक्यावर उभी आहे. तिला सरळ पायावर उभी करावी लागेल. नाहीतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय परिषदा केवळ विरंगुळ्याची, पर्यटनाची ठिकाणे ठरतील.

आपण क्षणोक्षणी श्वास घेतो म्हणून जिवंत राहतो. रोज पाणी पितो, अन्न खातो म्हणून जगतो. पण हे अस्तित्व देणाऱ्या पृथ्वीला गृहीत धरतो. औद्योगिकीकरण नसेल तर जगणार कसे, हा भौतिक विकास प्रकल्पांच्या समर्थकांचा प्रश्न किती हास्यास्पद होता, हे आता पूर्ण स्पष्ट झाले आहे.

माणसे कुढतात औद्योगिकीकरणासाठी, शहरीकरणासाठी, त्यातल्या धंदा-नोकरीसाठी, जे त्यांना नष्ट करत आहे आणि जी प्राणवायू, पाणी आणि अन्न देऊन जगवते ती पृथ्वी, तिचे लचके तोडण्यावर हे औद्योगिकीकरण चालते. स्वयंचलित यंत्राबरोबर आलेले तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र विज्ञानाचे नाव घेऊन पृथ्वीचा नाश घडवत गेले. परंतु हे कधीही विज्ञान नव्हते. विज्ञानाने याला मंजुरी दिली नव्हती. आज तापमानवाढीबाबतचे विज्ञान तात्काळ औद्योगिकीकरण थांबवण्यास सांगत आहे.

आज करोनाप्रतिबंधक लॉकडाऊनमध्ये हे सत्य आपण स्वीकारणार की नाही?

आताच उद्भवलेल्या करोनाच्या फैलावाबाबत जागतिक आरोग्य संघटनेची अलीकडची माहिती अशी आहे, इनक्युबेशन पिरियड म्हणजे बाधा होणे आणि लक्षणे दिसणे यामधील काळ, ही गोष्ट समजून घ्यावी. हा सात, चौदा किंवा क्वचित त्यापेक्षा जास्त दिवसांचा काळ असतो. या काळात करोनाची बाधा झालेल्या माणसाकडून विषाणू पसरवले जात असतात. पण याची त्याला वा त्याच्या संपर्कात आलेल्या माणसाला जाणीव नसते. रोगप्रतिकारशक्ती चांगली असलेल्या माणसाचा आजार आटोक्यात येऊ शकतो, पण ज्याची प्रतिकारशक्ती कमी आहे वा ज्याला इतर आजारांनी ग्रासले आहे, अशा व्यक्तीला धोका संभवतो.

म्हणून जागतिक आरोग्य संघटना, करोनाच्या रुग्णाबाबत लक्षणे दिसण्याच्या आधीच्या दोन दिवसांत संपर्कात आलेल्या माणसांची कोरोना चाचणी करण्यास सांगते.

इनक्युबेशनच्या काळात माणूस त्याचे काम आणि व्यवसायाप्रमाणे १५-२५ पासून हजार-पाचशे वा जास्त माणसांच्या संपर्कात येतो. ती माणसे त्यांना लागण झाल्यास या प्रमाणात करोनाचा प्रसार करतात. म्हणून अणूच्या शृंखला प्रक्रियेप्रमाणे स्फोटक वाढ होते. हे चीन, इटाली, स्पेन, जर्मनी आणि अमेरिकेत घडले. म्हणून लॉकडाऊन अत्यंत जरुरीचे आहे.

चिकन, मटण आणि मासे खाण्याची ही वेळ नाही. कडधान्य, कांदा बटाटा भरून ठेवा. नाहीतर लॉकडाऊनचा काळ वाढत जाईल. जगण्यासाठी खावे, खाण्यासाठी जगू नये, असे भारतीय संस्कृती आणि आहारशास्त्र सांगते.

ड्रायफ्रूट, चॉकलेट, आइस्क्रीम या गोष्टींची दुकाने वा त्यांची घरपोच सेवा बंद करावी. अशाने लॉकडाऊनला अर्थ उरत नाही. अशा पदार्थांसाठी बाजारहाट करणाऱ्यांशी बोलल्यावर कळते की त्यांना असे वाटते की, त्यांच्या भागात करोना नाही. पण ही माणसे लक्षात घेत नाहीत की, जेथे रुग्ण सापडले आणि जे विभाग पोलिसांनी सील केले तेथील माणसेही आधी असेच बोलत होती. चीन, युरोप आणि अमेरिकेतील, फार कशाला, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंपदेखील याच भ्रमात होते. आता तरी आपण शहाणे होऊ या. या संकटातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा एकदा निसर्गाकडे जाऊ या.

– ॲड. गिरीश राऊत
भारतीय जीवन आणि पृथ्वीरक्षण चळवळ
(संपर्क : ९८६९ ०२३ १२७)

हा डाव साधलेला...!

करोना लॉकडाऊनमधील १२ एप्रिलची सायंकाळ. सूर्यास्त होऊन गेलेला. पक्ष्यांच्या कर्कश चरचराटाने लेखनातली तंद्री भंगली.

बाहेर पाहिलं, तर जवळच्या चाफ्याच्या झाडावर शेजारचं मांजर चढलेलं. काळजाचा ठोकाचं चुकला. ताड्कन खुर्चीतनं उठलो नि मांजराच्या दिशेने सरसावलो. मांजर काही खाली उतरेना. मिजाशीत असलेलं. इच्छा नसताना काठीनं एक फटका दिल्यावर पळालं खरं! पण तोवर खूप उशीर झालेला. रेड व्हेंटेड बुलबुलची (लाल बुडाचा बुलबुल) तीन अंडी त्याच्याकडून फस्त झालेली. अतीव दु:ख झालं. लेखनातल्या तंद्रीनं पक्ष्यांचा चरचराट समजायला मलाच उशीर झालेला. गेल्या वर्षी कावळ्याने आणि यावर्षी मांजराने, हा डाव साधलेला...!

खूपसं उंचीवर गेलेलं म्हणून गेल्या पावसाळ्यात पाच फुटांवर चाफ्याचं झाड तोडलेलं. तिथूनच लगेच तो चारही दिशांना फुटला. नववर्षी चांगला वाढून एव्हाना हिरव्यागार पानांनी गच्च भरलेला. त्याच्या बेचकीतल्या जागा बघून बुलबुलनं बहुदा याला निवडलेलं. न राहवून रात्री चाफ्याच्या झाडाकडं पाहिलं. पाच फुटाचं ते झाडंही आता मेल्यागत झालेलं. पानंही स्तब्ध! लालबुड्या बुलबुलच्या (याच्या शेपटीच्या बुडाखाली लाल रंगाचा डाग असतो) वेदना त्यांनाही जाणवल्या असतील. लवकरच चाफ्याच्या अंगाखांद्या-फांद्यांवरच्या घरट्यात छानसं बालपण नांदणार होतं. चाफ्यानंही त्यांच्यासाठी म्हणून स्वप्नं पाहिली असतील. गेल्या वर्षी जास्वंदाची आणि यंदा चाफ्याची सारी स्वप्नं एका क्षणात मातीमोल झालेली. अंडी उबवायला लागणाऱ्या १४ दिवसांपैकी पहिल्या ४-५ दिवसांतच सगळं संपलेलं. धावणाऱ्या जगासोबत धावताना गेल्या वर्षी भावना शब्दबद्ध करायला उसंत नव्हती. यंदा नियतीनं 'करोना' नावानं ती पदरात टाकलेली. म्हणून हे खरडायला झालं.

साधारण तीन-चार वर्षांपूर्वी अशाच उन्हाळ्याच्या दिवसात रेड व्हेंटेड बुलबुलची नुकतीच घरट्याबाहेर आलेली इवलीशी पिल्लं उंबराच्या फांद्यांवर बसलेली दिसलेली. त्यांचे आई-बाबा जवळपास वावरत होते तेव्हा. ते दृश्य पाहून फार आनंद

झालेला. खरं तर पिल्लांच्या जन्मानंतर नर आणि मादी बुलबुलांचे हावभाव बदलतात. क्वचित चिंता, खाण्यासाठीची धावपळ आणि आनंदाचा कल्लोळ दिसतो. बुलबुल पिलांना चोचीतून चोचीत भरवतात. पिल्लं तेव्हा माना उंच करतात. ते दृश्य पाहणं अवर्णनीय सुखकारक असतं. माता, पिता आणि पिलांच्या ममतेचा झरा वाहत असतो तेव्हा घरट्यात. मादी बुलबुल रात्री पिलांना पंखांच्या उबेत घेऊन बसते. रात्री भूक लागली तर इकडेतिकडे फिरते. आठ-दहा दिवसांत पिल्लं बाळसं धरतात. त्यांना पंख फुटू लागतात. निसर्गात भरारी घेण्याची त्यांची धडपड चालू होते. हे सारं नजरेला पुन्हा टिपायचं होतं. बुलबुल आपल्या पिलांसमोर स्वत:चे पंख फडफडवून, उडून दाखवतात. मग पिल्लं त्यांचं अनुकरण करतात. मातापित्याच्या अनुकरणात पिलांचा उडायला शिकतानाचा हा रोमांच पूर्वी पाहिलेला.

गेल्या वर्षी २०१९ला याच मोसमात पाचच फूट उंचीच्या जास्वंदावर रेड व्हेंटेड बुलबुलनं घरटं केलेलं. फिमेल बुलबुल एकावेळी २ ते ५ अंडी देते. गेल्या वर्षीही तिनं तीन अंडी दिलेली. दुर्दैवाने कावळ्यानं ते पाहिलं. त्याला बघवलं नसावं. सर्वपित्री आमावास्येला बोलवूनही न येणारा कावळा घरट्याच्या वासानं मात्र न बोलविता आला. त्याचे प्रयत्न हाणून पाडण्याचा प्रयत्नही केलेला. घरट्याला नारळाच्या झावळ्यांचा आडोसाही करून पाहिला. पण उपयोग शून्य! घरट्यात अंडी आहेत की पिल्लं? हेही नीटसं माहीत नसलेल्या कावळ्यानं, मी घरात नसतानाची वेळ साधली. आपल्या चोचीनं रागारागानं प्रहार करून सारं घरटंच उद्ध्वस्त केलं. घरी आल्यावर सायंकाळी पाहिलं, तेव्हा अंड्यांची फिकट गुलाबी आणि त्यावर जांभळट रंगाचे ठिपके असलेली कवचं फुटून खाली पडलेली. काय मिळालं असेल कावळ्याला असं वागून? खूप राग आलेला तेव्हा मला त्याचा. यंदा पुन्हा बुलबुलनं घरच्या

ऑफिसच्या दारापासून पाच/सात फुटांवरच्या चाफ्यावर घरटं करायला घेतलेलं. चिरंजीवानं ते पहिल्यांदा पाहिलं. मला दाखवलं. परसदारी त्याचं लक्ष छान असल्याचा हेवा वाटलेला. बघता बघता कुठल्याशा गवताच्या छोट्या डहाळ्या, पानं आणि वाळलेल्या काड्या एकात एक गुंफून वाडग्याच्या क्वचित द्रोण आकाराचं घरटं साकारलेलं. सहसा न दिसणाऱ्या दाट झुडपांत साधारणत १ ते ३ मी. उंचीवर हे घरटं असतं, तसंच होतं. पण तरीही मनात धाकधूक होतीच. तेव्हापासून रेड व्हेंटेड बुलबुलच्या घरट्यावर दुरून नजर ठेवून होतो. आपण जवळ जावं तर शत्रूंना कळण्याचा धोका. अशातच गेल्या आठवड्यात सायंकाळी शेजारच्या या मांजराला झाडाजवळ घुटमळताना पाहिलेलं. मी समोरचं उभा असल्यानं जवळ यायची त्याची हिंमत झाली नव्हती. माझ्या मनात शंकेची पाल तेव्हाच चुकचुकलेली. सायंकाळी वाईट का चिंतावं? म्हणून विचार सोडून दिलेला. नि आज सायंकाळी हे घडलं. बुलबुलसारख्या छोट्या पक्ष्यांच्या अंड्यांवर कावळा, भारद्वाज यांच्यासह उंदीर, मांजर, साप, पाल हे शत्रू नजर ठेवून असतात. परसदारी या सर्वांचीच उपस्थिती असलेली.

आदल्या दिवशी सायंकाळी (११ एप्रिल) चिपळूणला पाऊस शिंतडलेला. इवल्याशा घरट्यात आपल्या तीन अंड्यांसह रेड व्हेंटेड बुलबुल सावरून बसलेली. घरट्यात अंडी घातल्यापासून जवळपास वावरणारी रेड व्हेंटेड बुलबुलची फिमेल आता गायब झालेली. मांजरानं हल्ला चढविल्यावर मदतीसाठी रेड व्हेंटेड बुलबुलनं आक्रोश केला असेल. नवागतांचा जन्मोत्सव साजरा करण्याची इच्छा बाळगणारा मी अभागी, लेखनात बुडालेला! पत्नी आणि चिरंजीव अन्यत्र बॅडमिन्टन खेळत असलेले. बुलबुलला काय वाटलं असेल? विचार करत असतानाच डोळ्यांसमोर अंधार पसरला. रेड व्हेंटेड बुलबुलला मी वेड्यासारखा

शोधत राहिलो...!

– धीरज वाटेकर, चिपळूण
(संपर्क : ९८६०३६०९४८)
(सर्व छायाचित्रे : धीरज वाटेकर)

To

Postal Regd. No. RTR/078/2018-20. Weekly Kokan Media printed on Friday and Posted on Saturday in Ratnagiri H.O. Post Office, with prepayment of postage. (With Stamps)

नवं क्षितिज उदयोन्मुख कलाकारांसाठी...

कोकणातील सांगीतिक चळवळ

स्वरसिंधुरत्न

पुरस्कार शास्त्रीय संगीत गायन स्पर्धा-२०२०

रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील
नवोदित गायक कलाकारांसाठी

हिंदुस्थानी शास्त्रीय गायन स्पर्धा

शालेय गट (११ ते १६ वर्षे), युवा गट (१७ ते ३५ वर्षे),
खुला गट (३५ वर्षावरील).

पुरस्काराचे स्वरुप...

रोख १०,०००/- रुपये, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह

स्पर्धा दिनांक २३ आणि २४ मे २०२० रोजी,

स्पर्धेचे स्थळ :

संत राऊळ महाराज महाविद्यालय कुडाळ, जिल्हा - सिंधुदूर्ग,

स्पर्धेसाठी अर्ज भरण्याची अंतीम तारिख १२ मे २०२०.

फॉर्म भरण्यासाठी आणि माहितीसाठी गुगल लिंक

संपर्क : प्रा. प्रशांत धोंड, भ्रमणध्वनी (मोबाईल) क्र.: ९४०३६५१५३८/ ९४२३३०३४३२

डॉ. प्रणव प्रभू, भ्रमणध्वनी (मोबाईल) क्र.: ९४२१०७३९०७